# सातारा जिल्हा परिषद, सातारा

## ग्रामपंचायत विभाग

जिल्हा परिषद मुख्य इमारत, चौथा मजला,
सातारा कोरेगांव रोड, सदर बझार कॅम्प ,सातारा—415001
दुरध्वनी क्रमांक ( 02162 - 295043 ) ई - मेल:- Vptzpsatara2@yahoo.in


जा.क्र.ग्रापं/2(1)/ कावि/ कं.ग्रासे भरती /2024 दिनांक:- 05 / 10/2024

प्रति,

श्री./श्रीमती --------------------------------------

--------------------------------------

--------------------------------------

**विषय:** कंत्राटी ग्रामसेवक सरळसेवा पदभरती परीक्षा - 2023 मधील अंतिम निवड झालेल्या पात्र उमेदवारांनी ग्रामसेवक पदाच्या पदस्थापनेसाठी समुपदेशनास मंगळवार दिनांक- 08.10.2024 रोजी सकाळी 10.00 वाजता उपस्थित राहण्याबाबत.

**संदर्भ** :-दिनांक- 05.10.2024 रोजी जिल्हा परिषद सातारा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली कंत्राटी ग्रामसेवक पदाची जिल्हा निवड समितीने मान्यता दिलेली अंतिम निवड यादी.

उपरोक्त संदर्भीय विषयांस अनुसरुन जिल्हा परिषद,सरळसेवा पदभरती परीक्षा-2023 अंतर्गत कंत्राटी ग्रामसेवक पदाची जिल्हा निवड समितीने मान्यता दिलेली अंतिम निवड यादी दिनांक-05.10.2024 रोजी जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कंत्राटी ग्रामसेवक पदाचे नियुक्ती आदेश समुपदेशन पध्दतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक- 08.10.2024 रोजी देणेत येणार आहेत. तरी आपण उपरोक्त दिनांकास श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह,चौथा मजला,जिल्हा परिषद,सातारा येथे सकाळी 10.00 वाजता वेळेत उपस्थित रहावे.जे उमेदवार समुपदेशनास उपस्थित राहणार नाहीत त्यांचे पदस्थापने विषयी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,सातारा यांचेस्तरावर निर्णय होवून तो संबंधित उमेदवारास बंधनकारक राहिल.

तसेच समुपदेशन प्रक्रियेत उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करण्याचा अथवा इतर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास प्रशासन त्याची गांभिर्याने दखल घेईल याची नोंद घ्यावी

(सतिश बुध्दे)
**सदस्य सचिव**
जिल्हा निवड समिती तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रापं)
सातारा जिल्हा परिषद,सातारा

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

1. मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी सातारा
2. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी.जि.प.सातारा.
3. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जि.प.सातारा